मसुदा
क्र. ५/२०१५-१६

गोपनीय
व्यवस्थापन परिषद

## मुंबई विद्यापीठ

व्यवस्थापन परिषदेची सभा *गुरूवार, दिनांक १९ नोव्हेंबर, २०१५ रोजी सकाळी ११.००* वाजता सर फिरोजशहा मेहता व्यवस्थापन परिषदेचे दालन, विद्यापीठ इमारत, उत्तर विभाग, फोर्ट, मुंबई - ४०० ०३२, येथे सुरू झाली. सभेमध्ये खालील नमूद केल्याप्रमाणे सदस्य उपस्थित होते.

१. डॉ. संजय व्ही. देशमुख, (कुलगुरू)

२. श्री. सिध्दार्थ खरात (उपसचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग)

३. श्री. सुरेश मेश्राम (सहसंचालक, तंत्रशिक्षण संचालनालय)

४. श्री. शैलेद्र देवळणकर (सहसंचालक, उच्च शिक्षण, मुंबई विभाग)

५. डॉ. अनिल पाटील, (संचालक, बी.सी.यु.डी.)

श्री. अ.आ. फळणीकर, वित्त व लेखा अधिकारी आणि श्री. दिपक वसावे, परीक्षा नियंत्रक हे कायम निमंत्रित म्हणून उपस्थित होते.

श्रद्धांजली:-

### माजी राष्ट्रपती डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम

मुलांचे लाडके 'कलामचाचा', 'मिसाईल मॅन' अशी ख्याती असलेले शास्त्रज्ञ आणि लोकप्रिय माजी राष्ट्रपती भारतरत्न डॉ. ए.पी.जे.अब्दुल कलाम यांचे हृदयविकाराने दिनांक २७ जुलै, २०१५ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते ८४ वर्षांचे होते.

### श्री. भालचंद्र ऊर्फे अण्णा पेंढारकर

संगीत रंगभूमीचा चालताबोलता इतिहास असलेले मराठी रंगभूमीवरील अष्टपैलू व्यक्तिमत्व श्री. भालचंद्र पेंढारकर यांचे वृध्दापकाळाने दिनांक ११ ऑगस्ट, २०१५ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते ९४ वर्षांचे होते.

### डॉ. सय्यद अहमद

मणिपूरचे राज्यपाल आणि महाराष्ट्राचे माजी मंत्री डॉ. सय्यद अहमद यांचे दिनांक २८ सप्टेंबर २०१५ रोजी निधन झाले.

### श्रीमती. पार्वतीबाई पाटील

मुंबई विद्यापीठाचे संचालक डॉ. दिलीप पाटील यांच्या मातोश्री पार्वतीबाई पाटील यांचे दिर्घ कालीन आजाराने दिनांक ८ आक्टोंबर २०१५ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते ८२ वर्षांचे होते.

श्री. अशोक सिंघल

विहिंपचे ज्येष्ठ नेते श्री. अशोक सिंघल यांचे ह्यदयक्रिया बंद पडल्याने दिनांक १७ नोव्हेंबर २०१५ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते ८९ वर्षांचे होते.

तसेच मुंबई विद्यापीठातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी जे या काळात निधन पावले त्यांनाही श्रंध्दाजली वाहण्यात येते.

**<u>बाब १:</u>** दिनांक ३१ ऑगस्ट, २०१५ रोजी संपन्न झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या सभेचे इतिवृत्त मंजूर करणेबाबत.

ठराव असा ठराव करण्यात आला की, ३१ ऑगस्ट, २०१५ रोजी संपन्न झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्य इतिवृत्तास मान्यता देण्यात आली.

**<u>बाब २:</u>** विद्यापीठाच्या बृहत आराखडयावर विचार विनिमय करणे.

ठराव: सखोल चर्चेअंती असा ठराव करण्यात येतो की, महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम, १९९४ चे कलम ८२ नुसार महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ यांच्या दिनांक १६ नोव्हेंबर, २०१५ रोजी संपन्न झालेल्या सभेत बाब क्रमांक १ मध्ये मंजूर झाला, त्यानुसार शैक्षणिक वर्ष २०१६-१७ करिता अद्ययावत केलेला बृहत आराखडा मा. सदस्यांनी सूचविलेल्या सुचनासह मान्य करण्यात यावा असे ठरले.

तसेच, प्राचार्य (डॉ.) अनिल पाटील, संचालक बी.सी.यु.डी. यांना विद्ववत परिषेदेच्या सभेत हा बृहत आराखडा मंजुरीसाठी सादर करावा असे ही ठरले.

(सदर ठराव याच बैठकीत वाचून दाखविण्यात आला व सदर ठरावाचे इतिवृत्त मंजुर करण्यात आले.)

<u>आयत्यावेळी अध्यक्षांच्या परवानगीने घेण्यात आलेल्या बाबी.</u>

**<u>बाब ३:</u>** महाराष्ट्र अकृषि विद्यापीठे आणि संलग्नित महाविद्यालये प्रमाणसंहिता (शिक्षकेतर कर्मचा-यांच्या सेवा व शर्ती) नियमावली, १९८४ रद्द करुन सामायिक परिनियम (Common Statute) लागू होई पर्यंत शिक्षकेतर कर्मचा-यांची प्रकरणे विद्यापीठे/सहसंचालक/संचालक (उच्च शिक्षण/तंत्र शिक्षण) यांनी यापुढे महाराष्ट्र नागरी सेवा नियमांतील तरतूदी नुसार हाताळणेबाबत

ठराव असा ठराव करण्यात आला की, महाराष्ट्र अकृषि विद्यापीठे आणि संलग्नित महाविद्यालये प्रमाणसंहिता (शिक्षकेतर कर्मचा-यांच्या सेवा व शर्ती) नियमावली, १९८४ रद्द करुन सामायिक परिनियम (Common Statute) लागू होई पर्यंत शिक्षकेतर कर्मचा-यांची पदोन्नती व सेवाबाबतची प्रकरणे विद्यापीठे/सहसंचालक/संचालक (उच्च शिक्षण/तंत्र शिक्षण) यांनी यापुढे महाराष्ट्र नागरी सेवा नियमांतील तरतूदी नुसार हाताळणेबाबत गठीत करण्यात आलेल्या समितीच्या अहवालावर सहसंचालक (उच्च शिक्षण, मुंबई विभाग) यांचा अभिप्राय घेवून व्यवस्थापन परिषदेपुढे बाब पुन्हा सादर करावी.

Item 4: An item is, therefore, being placed before the Management Council for nominating two members from amongst the members of the Management Council on the Selection Committee.

Resolution: *Resolved* that the Shri Shailendra Devlankar (Joint Director of Higher Education, Mumbai Division) and Shri Suresh Meshram (Joint Director, Directorate of Technical Education) be nominated as two members from amongst the members of the Management Council on the Selection Committee.

Item 5: Draft Memorandum of Understanding (MoU) for Cultural Education and Scientific Agreement between Faculdades Catolicas, sponsor of Pontificia Universidade Catolica do Rio De Janeiro and University of Mumbai.

Resolution: *Resolved* that the draft Memorandum of Understanding (MoU) for Cultural Education and Scientific Agreement between Faculdades Catolicas, sponsor of Pontificia Universidade Catolica do Rio De Janeiro and University of Mumbai be accepted.

Item 6: Draft Memorandum of Understanding (MoU) between the Institute for Foreign Affairs and Trade (IFAT) and the University of Mumbai.

Resolution: *Resolved* that the memorandum of Understanding (MoU) between the Institute for Foreign Affairs and Trade (IFAT) and the University of Mumbai be accepted.

Item 7: Draft Memorandum of Understanding (MoU) between Istanbul University for protocol of collaboration between University of Mumbai and Istanbul University.

Resolution: *Resolved* that the draft memorandum of Understanding (MoU) between Istanbul University for protocol of collaboration between University of Mumbai and Istanbul University be accepted.

बाब ८: महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम, १९९४ कलम १४ (७) अन्वये मा. कुलगुरुंना प्रदान केलेल्या अधिकारांअंतर्गत एका सदस्याचे नामनिर्देशन महाविद्यालये व विद्यापीठ विकास मंडळावर करण्यात आले आहे. सदर बाब मा. व्यवस्थापन परिषदेस माहिती तथा कार्योत्तर मंजूरीसाठी सादर.

ठराव : महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम, १९९४ कलम ३५ (२) (च) नुसार महाविद्यालये व विद्यापीठ विकास मंडळावर व्यवस्थापन परिषदेकडून एक सदस्य नामनिर्देशित करण्यात येतो. याबाबत असा ठराव करण्यात आला की, वेळे अभावी मा.कुलगुरूंनी कलम १४ (७) अन्वये त्यांना बहाल करण्यात आलेल्या अधिकारात व्यवस्थापन परिषदेच्या वतीने डॉ. विरेंद्रकुमार मिश्रा यांची महाविद्यालये व विद्यापीठ विकास मंडळावर करण्यात आलेल्या नियुक्तीस मान्यता देण्यात आली.

बाब ९: मुंबई विद्यापीठाचे विजया लक्ष्मी विश्वनाथ दळवी महाविद्यालयाची (मॉडेल कॉलेज) इमारत उभारण्यासाठी तळेरे पंचक्रोशी शिक्षण प्रसारक मंडळ या संस्थेची २ एकर जमीन मुंबई विद्यापीठाला बक्षीसपत्राने मोफत देण्याबाबत

ठराव: असा ठराव करण्यात आला की, मुंबई विद्यापीठाचे विजया लक्ष्मी विश्वनाथ दळवी महाविद्यालयाची (मॉडेल कॉलेज) इमारत उभारण्यासाठी तळेरे पंचक्रोशी शिक्षण प्रसारक मंडळ या संस्थेने मुंबई विद्यापीठास बक्षीसपत्राने मोफत दिलेल्या जमीनीस मान्यता देण्यात आली. पुढे असाही ठराव करण्यात आला की, तळेरे पंचक्रोशी शिक्षण प्रसारक मंडळाने केलेल्या सहकार्याबद्दल विद्यापीठमार्फत आभार पत्र तात्काळ पाठविण्यात यावे.

**Item 10:** The proposal for extension of the Research project based on Kautilya Arthashastra for a further period of 5 years from 21st June 2015 received from Dr. Meenal Katarnikar, Associate Professor and I/c. Head, University Department of Philosophy, Vidyanagari, Mumbai.

Resolution: *Resolved* that the proposal for extension of the Research project based on Kautilya Arthashastra for a further period of 5 years from 21st June 2015 received from Dr. Meenal Katarnikar, Associate Professor and I/c. Head, University Department of Philosophy, Vidyanagari, Mumbai be accepted.

**Item 11:** The Prof.-cum-Director, Institute of Distance and Open Learning *vide* his letter No. IDOL/5775/2015 dated 26th March, 2015 has requested to create the post of Senior System Analyst on the establishment of the Institute.

Resolution: *Resolved* that the Prof.-cum-Director, Institute of Distance and Open Learning *vide* his letter No. IDOL/5775/2015 dated 26th March, 2015 has requested to create the post of Senior System Analyst on the establishment of the Institute be accepted.

**बाब १२:** परीक्षा मंडळावर सदस्य नामनियुक्त करणे बाबत.

ठराव : महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम, १९९४ कलम ३१ (३) (e) आणि ३१ (३) (f) अन्वये परीक्षा मंडळावर व्यवस्थापन परिषदेकडून दोन सदस्य नामनिर्देशित करण्यात येतात. याबाबत असा ठराव करण्यात आला की, वेळे अभावी मा.कुलगुरूंनी कलम १४ (७) अन्वये त्यांना बहाल करण्यात आलेल्या अधिकारात व्यवस्थापन परिषदेच्या वतीने प्रा. (डॉ.) विजय जोशी व डॉ. इंदू जॉर्ज यांची परीक्षा मंडळावर करण्यात आलेल्या नियुक्तीस मान्यता देण्यात आली.

**बाब १३:** दुर व मुक्त अध्ययन संस्थेच्या (IDOL) सल्लागार समितीच्या सदस्यांना बैठकीसाठी निमंत्रितास मानधन देण्याबाबत.

ठराव : असा ठराव करण्यात आला की, दुर व मुक्त अध्ययन संस्थेच्या (IDOL) सल्लागार समितीच्या सदस्यांना बैठकीसाठी मानधन किती देण्यात यावे याबाबतचा निर्णय वित्त व लेखा समितीपुढे बाब ठेवून मान्यता घेण्यात यावी.

**बाब १४:** दुर व मुक्त अध्ययन संस्थेचे ग्रंथालय अस्थायी कर्मचारी तसेच विद्यानगरीतील रहिवासी यांना उपलब्ध करून देणेबाबत.

**ठराव:** असा ठराव करण्यात आला की, दुर व मुक्त अध्ययन संस्थेचे ग्रंथालय अस्थायी कर्मचारी तसेच विद्यानगरीतील रहिवासी यांना उपलब्ध करून देण्यास मान्यता देण्यात आली.

**Item 15:** Draft of Memorandum of Understanding (MoU) for Academic Cooperation between University of Mumbai and IDC Herzliya, Israel for academic cooperation.

Resolution: *Resolved* that the memorandum of Understanding (MoU) for Academic Cooperation between University of Mumbai and IDC Herzliya, Israel for academic cooperation be accepted.

**Item 16:** Draft of Memorandum of Understanding (MoU) between MGIMO University and the University of Mumbai, India, for academic cooperation.

Resolution: *Resolved* that the memorandum of Understanding (MoU) between MGIMO University and the University of Mumbai, India, for academic cooperation be accepted.

**Item 17:** Draft of Memorandum of Understanding (MoU) for Academic Cooperation between University of Mumbai and Ben-Gurion University of the Negev, Beer-Sheva, Israel for academic cooperation.

Resolution: *Resolved* that the memorandum of Understanding (MoU) for Academic Cooperation between University of Mumbai and Ben-Gurion University of the Negev, Beer-Sheva, Israel for academic cooperation be accepted.

**Item 18:** प्राचार्य, संस्कारधाम केळवाणी मंडळाचे, जशभाई मगनभाई पटेल कॉलेज ऑफ कॉमर्स, उन्नत नगर, एम.जी.रोड, आझाद मैदानाजवळ, गोरेगाव (पश्चिम), मुंबई –४०० ०९०, यांनी संदर्भ क्र. JMPC/146/2015-16 दिनांक ३०/०६/२०१५च्या पत्रांन्वये तृतीय वर्ष वाणिज्य शाखेमध्ये शैक्षणिक वर्ष २०१५–१६ करीता १० जादा विद्यार्थी प्रवेशित (समावून घेण्याकरीता) करण्यासाठी विनंती केली आहे.

ठराव: असा ठराव करण्यात आला की, कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालयामधील प्रथम वर्ष अभ्यासक्रमासाठी दिलेल्या विद्यार्थी प्रवेश क्षमतेपेक्षा द्वितीय व तृतिय वर्षाच्या वर्गामध्ये प्रत्यक्ष प्रवेश क्षमतेपेक्षा जास्त विद्यार्थी म्हणजेच रिपीटरर्स विद्यार्थी प्रवेश घेत असतात. या जादा विद्यार्थ्यांना द्वितीय व तृतिय वर्षाच्या वर्गामध्ये प्रवेश देण्यास नविन तुकडी होऊ नये या अटीवर मान्यता देण्यात येत आहे.

मान्यतेसाठी

| कुलगुरू | कुलसचिव | संचालक, बी.सी.यु.डी. | ~~स्थानापन्न~~ उपकुलसचिव (का.प्रा.वि) |
|---|---|---|---|